# १ महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

## १) शेतमाल तारण कर्ज योजना :

- योजनेची सुरुवात सन १९९०-९१ पासून
- शेतकऱ्यास बाजार भावाच्या ७५ टक्के रकमेचे वितरण
- पिके - तूर, मूग, उडीद, करडई, धान, सोयाबीन, चना, सुर्यफुल, काजू बी, हळद इ. या पिकांसाठी ७५% रक्कम.
- ज्वारी, बाजरी, गहू आणि मका - ५० टक्के किंवा रु. ५००/- प्रति क्विंटल
- बेदाणा - बाजार भावाच्या ५० टक्के किंवा रु. ३०,०००/- प्रति क्विंटल
- व्याजदर - ६ टक्के, बेदाण्यासाठी ८ टक्के.
- मुदत - ६ महिने.

## २) हमाल भवन :

- बाजार समित्यांचे आवारात हमाल भवनाची बांधणी
- लाभार्थी - राज्यातील बाजार समित्या.
- अनुदान - प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के किंवा रु. २.०० लाख यापैकी जी रक्कम कमी असेल ती.

## ३) राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत - कांदाचाळ अनुदान योजना :

- अंमलबजावणी - महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ
- क्षमता - ५,१०,१५,२५ आणि ५० मे. टन
- लाभार्थी - वैयक्तिक शेतकरी/सहकारी संस्था/बाजार समित्या/कांदा उत्पादक संघ/खरेदी-विक्री संघ
- निर्धारित बांधकाम खर्च - रु. ६,००० प्रती मे. टन साठवणूक क्षमता
- वैयक्तिक शेतकरी - जास्तीत १०० मे. टन
- संस्था / बाजार समित्या - जास्तीत जास्त ५०० मे. टन
- अनुदान - खर्चाच्या २५ टक्के किंवा जास्तित जास्त रु. १५००/- मे. टन साठवणूक क्षमता

## ४) युरोपियन देशासाठी कांदा निर्यात वाहतूक अनुदान योजना :

- योजनेची सुरुवात दि. १ एप्रिल २००६ पासून
- निकष - फक्त युरोपियन देशात निर्यात केलेल्या कांदा वाहतुकीसाठी अनुदान
- लाभार्थी - सहकारी संस्था/खाजगी निर्यातदार
- अनुदान - रु. १०,०००/- प्रति रेफर कंटेनर
- मर्यादा : प्रति निर्यातदार रु. ५०,०००/- मर्यादेपर्यन्त अनुदान

## ५) जहाज वाहतूक भाडे अनुदान योजना :

- योजनेची सुरुवात सन २००२-२००३ पासून
- लाभार्थी - फळे व भाजीपाला निर्यात करणाऱ्या सहकारी संस्था
- अनुदान - वाहतूक भाड्याच्या १० टक्के अथवा रु. १०,०००/-

## ६) शीतगृह उभारणीसाठी अनुदान योजना :

- योजनेची सुरुवात दि. १ ऑगस्ट २००४
- लाभार्थी - बाजार समिती, पणन/प्रक्रिया/फुले/फळे/भाजीपाला उत्पादक संस्था, साखर कारखाने, शेती उत्पादकांच्या संस्था
- अनुदान - रु. २५००/- प्रती मे.टन (२५ टक्के) कमाल रु. २.५ लाख
- १०० मे.टन क्षमतेपर्यंत अनुदान उपलब्ध
- उभारणी खर्च रु. १० हजार प्रती मे.टन

## ७) शेतकरी बाजार योजना :

- शेतकऱ्यांना योग्य भाव मिळवून देणे.
- ग्राहकास शेतीमाल योग्य दरात उपलब्ध करुन देणे.
- शेतकरी आणि ग्राहक यांना सर्व मध्यस्थ टाळून एकत्रित आणणे.
- कर्ज - खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. १०.०० लाख
- कर्ज परतफेड कालावधी - १० वर्षे
- व्याजाचा दर ५ टक्के
- शेतकरी बाजाराच्या उभारणीसाठी रु. ३०.०० लाखापर्यंतच्या खर्चास मा. पणन संचालकांची कलम १२(१) अन्वये सर्व साधारण मंजूरी.

## ८) प्रोजेक्शन टी. व्ही. (इन्फॉरमेशन डिस्प्ले) योजना :

- बाजार आवारात शेतमालाची आवक, बाजारभाव व शेतीविषयक माहिती दर्शविणे.
- लाभार्थी - बाजार समिती
- शासनाच्या विविध योजना, कृषि उत्पादन तंत्रज्ञान, सुगी पाश्चात तंत्रज्ञान, ग्रेडिंग, पॅकींग इ. बाबत माहिती तसेच जाहिरात दर्शविली जाते.
- बाजार समितीचे उत्पन्न रु. १.०० कोटी पेक्षा कमी असल्यास खर्चाच्या ५०% आणि रु. १.०० कोटी पेक्षा जास्त असल्यास खर्चाच्या ३३% अनुदान
- सध्यस्थितीत ६१ बाजार समित्यांमध्ये प्रोजेक्शन टी.व्ही. कार्यरत

## ९) फळ महोत्सव अनुदान योजना :

महाराष्ट्र राज्यामध्ये विविध प्रकारच्या फळे आणि भाजीपाल्याचे तसेच प्रक्रियायुक्त उत्पादनांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत असून, सदर मालाच्या देशांतर्गत विपणन व्यवस्थेतील मध्यस्थांची साखळी वगळून उत्पादकांना थेट ग्राहकाला दर्जेदार मालाची किफायतशीर दरांमध्ये विक्री करता यावी यासाठी कृषि पणन मंडळामार्फत फळमहोत्सव अनुदान सुरू केलेली आहे.

### योजनेची ठळक वैशिष्ट्ये :

१) सदर अनुदान योजनेचा लाभ फक्त राज्यातील उत्पादकांच्या नोंदणीकृत सहकारी संस्था/संघ/बाजार समित्या/बचत गट यांनाच घेता येऊ शकेल.

२) सदरची योजना ताजी फळे, भाजीपाला व कृषिजन्य प्रक्रियायुक्त उत्पादनांच्या महोत्सवासाठी लागू राहील.

३) आयोजित करण्यात येणाऱ्या फळ महोत्सवांचा कालावधी हा किमान ५ दिवसांचा असणे बंधनकारक राहील.

४) मुंबई, ठाणे, नाशिक, अमरावती, नागपूर, औरंगाबाद, सोलापूर, कोल्हापूर या शहरांमध्ये फळ महोत्सवांचे आयोजन केल्यास स्टॉल उभारणीच्या खर्चावर प्रती स्टॉल रु. १,०००/- व इतर शहरांमध्ये फळ महोत्सवांचे आयोजन केल्यास प्रती स्टॉल रु. ७००/- प्रमाणे अर्थसहाय्य देय राहील.

५) जाहिरात व प्रसिद्धीसाठी महानगरपालिका असलेल्या सर्व शहरांकरिता रु. १०,०००/- व अन्य जिल्हा मुख्यालयांच्या शहरांना रु. ५,०००/- इतके अर्थसहाय्य.

६) सदर योजनेअंतर्गत प्रत्येक महोत्सवासाठी किमान १० व कमाल ५० स्टॉलसाठी अर्थसहाय्य देय राहील.

७) योजनेचा लाभ घेण्यासाठी महोत्सवाच्या आयोजनापूर्वी कृषि पणन मंडळाची तत्वत: मंजुरी घेणे बंधनकारक.

८) अर्थसहाय्य योजनेचा लाभ घेण्यासाठी आयोजक संस्थेकडून स्टॉल उभारणीपोटी कंत्राटदाराला अदा केलेल्या व मिळालेल्या रक्कमेबाबतची अनुषंगिक कागदपत्रे कृषि पणन मंडळाकडे सादर करणे बंधनकारक.

९) एका संस्थेला एका आर्थिक वर्षामध्ये फक्त दोन वेळाच अर्थसहाय्याचा लाभ घेता येऊ शकेल.

१०) आयोजक संस्थेमार्फत करण्यात येणाऱ्या महोत्सवाच्या प्रचार व प्रसिद्धीमध्ये कृषि पणन मंडळाचा सहप्रायोजक म्हणून नामोल्लेख करणे संबंधीत संस्थेवर बंधनकारक राहील.

११) फळ महोत्सवामध्ये कृषि पणन मंडळाला सहभाग घ्यावयाचा झाल्यास आवश्यक स्टॉलची मोफत उपलब्धता करून देणे संबंधीत संस्थेवर बंधनकारक.

१२) कृषि पणन मंडळामार्फत 'कृषि पणन मित्र' या मासिकाचे प्रकाशन करण्यात येत असून त्यामध्ये कृषिमालाच्या देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय विपणनाबाबतची महत्त्वपूर्ण माहिती प्रसिद्धी करण्यात येते. आयोजक संस्थेमार्फत त्यांच्या सभासदांनी सदर मासिकाचे वर्गणीदार होण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

१३) आयोजित करण्यात येणाऱ्या फळमहोत्सवांचा अहवाल आणि काही निवडक फोटो महोत्सवाच्या आयोजनानंतर 'कृषि पणन मित्र' मासिकामध्ये प्रसिद्धीसाठी कृषि पणन मंडळाकडे सादर करावे लागतील.

१४) महोत्सवामध्ये होणाऱ्या विक्रीचा दैनिक अहवाल कृषि पणन मंडळास देणे बंधनकारक

## १०) प्लास्टिक क्रेटस् खरेदी अनुदान :

१) लाभार्थी हा द्राक्षे, आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, चिक्कू, आवळा, सिताफळ, पपई, स्टॉबेरी, पेरु या फळांचा उत्पादक असावा, त्यासाठी योजनेच्या आर्थिक वर्षातील ७/१२ उताऱ्यावर त्या फळपिकाची नोंद असणे तसेच कृषि विभागाचा फळबाग सद्या अस्तित्वात असलेबाबतचा दाखला असणे आवश्यक आहे.

२) ज्या लाभार्थ्याने या अगोदर राष्ट्रीय बागवानी बोर्ड, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, अपेडा किंवा इतर विभागाकडून क्रेट्ससाठी अनुदानाचा लाभ घेतलेला नसेल त्यांचा व ग्लोबलगॅप योजनेअंतर्गत पणन मंडळाकडे नोंदणी केलेल्यांचा या योजनेअंतर्गत प्राधान्याने विचार करण्यात येईल.

३) ज्या कंपन्यांच्या क्रेट्स उत्पादनाला आय. एस. आय. प्रमाणिकरण आहे अशा कंपन्याकडूनच क्रेट्सची खरेदी करणे फळ उत्पादकांवर बंधनकारक राहील.

४) शेतकऱ्याने खरेदी केलेल्या क्रेटसचे बील व संबंधीत कंपनीस रक्कम अदा केल्याची पक्की पावती सादर केल्यानंतर त्या मॉडेलची पणन मंडळाने निश्चित केलेली किंमत व शेतकऱ्याने खरेदी केलेल्या क्रेट्सची संख्या यानुसार एकूण रक्कमेच्या २५% प्रमाणे होणारी रक्कम अनुदान म्हणून शेतकऱ्यास धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल.

५) शेतकऱ्याने खरेदी केलेल्या क्रेट्सची प्रत्यक्ष पाहणी/तपासणी पणन मंडळामार्फत केली जाईल व सदर तपासणी अहवालानुसार शेतकऱ्यांना अनुदान रक्कम अदा केली जाईल.

६) या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्याकडे उपरोक्त नमूद फळपिकांपैकी एक किंवा अधिक फळपिकांखाली मिळून २ हेक्टरपर्यंत फळबाग लागवड असणाऱ्या शेतकऱ्यास ५० क्रेट्स व २ हेक्टरपेक्षा जास्त फळबाग असणाऱ्या १०० क्रेट्ससाठी अनुदान देय राहील.

७) या योजनेअंतर्गत एका लाभार्थ्यास कमाल १०० क्रेटससाठी अनुदान देण्यात येईल.

८) ज्या क्रेट्ससाठी पणन मंडळामार्फत अनुदान देण्यात आलेले आहे त्या क्रेट्सवर ''शेतकऱ्याचे नाव'', ''पणन मंडळाच्या अर्थसहाय्याने'' व ''विक्रीसाठी नाही'' इ. मजकूर लिहिणे बंधनकारक राहील.

९) या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी क्रेट्स खरेदी करण्यापूर्वी पणन मंडळाची तत्वत: मंजुरी घेणे बंधनकारक राहील.

१०) सदर योजनेचा एका लाभार्थ्याला फक्त एकदाच लाभ घेता येऊ शकेल.

११) सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी क्रेट्सची खरेदी आणि अनुदानाची मागणी ही १५ ऑगस्ट, २००८ ते ३१ मार्च २००९ या कालावधीमध्ये केलेली असावी.

लाभार्थ्याने प्रस्तावासोबत सादर करावयाच्या कागदपत्रांची तपासणी सूची :

१) मागणीदाराचा फोटोसह विहित नमुन्यातील अर्ज.

२) ज्या फळ पिकासाठी क्रेट्स अनुदानाची मागणी केलेली आहे त्या फळ पिकाची सातबारा उताऱ्यावर नोंद असल्याचा तीन वर्षाच्या नोंदीची छायाप्रत आवश्यक.

३) शेतकऱ्याच्या बागेमध्ये संबंधीत फळ पिकाची लागवड अस्तित्वात असल्याचा व क्रेट्सची खरेदी केली असल्याचा संबंधीत बाजार समितीचे सचिव अथवा कृषि पणन मंडळाच्या विभागीय व्यवस्थापकांचा तपासणी अहवाल आवश्यक.

४) खरेदी करण्यात आलेल्या क्रेट्सचे सी.एस.टी./बी.एस.टी. तपशिलासह पक्के देयक सादर करणे आवश्यक.

५) क्रेट्स खरेदीपोटी इतर केंद्र तथा राज्य शासनाच्या कोणत्याही विभागाकडून अनुदान घेतले नसल्याचे हमीपत्र सादर करणे आवश्यक.

●●●


# हॉर्टीकल्चर ट्रेनिंग सेंटर

✻ ''प्रात्यक्षिकातून प्रशिक्षण''✻

**- पायाभूत सोयी सुविधा -**

**एच. टी. सी. मध्ये सर्व सोयी सुविधांनी युक्त क्लास रूम्स, दहा विविध प्रकारची हरितगृहे, हवामान शास्त्र केंद्र, युटिलिटी बिल्डिंग, शैक्षणिक साहित्य, ग्रंथालय, वसतिगृह, रेस्टॉरंट आणि मनोरंजन इत्यादी सुविधा या ठिकाणी उपलब्ध आहेत.**

**- एक आठवड्याचे प्रशिक्षण कार्यक्रम -**

**१) हरितगृह व्यवस्थापन**
**२) हरितगृहामध्ये स्वयंचलित उपकरणांचा वापर**
**३) फुल पिके व शोभिवंत पिकांची लागवड (शेतावरील लागवड)**
**४) रोपांची अभिवृद्धी आणि रोपवाटिका व्यवस्थापन**
**५) पीकनिहाय अभ्यासक्रम : गुलाब लागवड / जेरबेरा आणि कार्नेशन/ॲन्युरियम आणि ऑर्किड / भाजीपाला लागवड**
**६) फळे, फुले व भाजीपाला पणन व्यवस्थापन**
**७) सेंद्रिय शेती**
**८) व्हॅनिला आणि स्टिव्हिया लागवड, प्रक्रिया व विपणन**
**९) एकात्मिक कीड व्यवस्थापन**

**अधिक माहितीसाठी संपर्क**

## हॉर्टीकल्चर ट्रेनिंग सेंटर

**सर्व्हे नं. ३९८-४००, सी. आर. पी. एफ. कँपस जवळ, पुणे मुंबई महामार्ग, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे पिन - ४१०५०६, महाराष्ट्र**
**फोन - + ९१-०२११४-२२३९८०, टेलिफॅक्स + ९१-०२११४-२२६०८७, मोबाईल : ९४२२० ३०७७५**
**ई-मेल - htc_td@vsnl.net वेबसाईट - www.msamb.com**